पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.



# ‘देशदूत’-‘सार्वमत’ रायझिंग स्टार पुरस्कार सोहळा

## दा नांग शहरात १४ गुणवंत उद्योजकांचा शानदार समारंभात गौरव

### ‘नमस्ते इंडिया’

‘देशदूत’-’सार्वमत’ रायझिंग स्टार पुरस्कार वितरण समारंभाच्या प्रमुख पाहुण्या टूरिझम प्रमोशन सेंटरच्या उपसंचालक मिस माई थी तनहाय यांनी आपल्या संबोधनाला ‘नमस्ते इंडिया’ अशी सुरुवात करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. व्हिएतनामच्या पर्यटन विकासाला पूरक ठरणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करताना त्या म्हणाल्या की, ‘देशदूत’ व ‘सार्वमत’ने अतिशय उत्तमरीत्या या पुरस्कार समारंभाचे आयोजन केले. व्हिएतनामच्या पर्यटन प्रगतीत भारतीय नागरिकांचा फार मोठा वाटा असून, येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत भारतीय पर्यटकांचा क्रमांक दुसरा आहे. सध्या दा नांग शहरासाठी अहमदाबादहून थेट हवाईसेवा उपलब्ध आहे. मुंबई, नवी दिल्ली येथून हनोई, हो ची मिन्ह येथे येणाऱ्या भारतीय पर्यटकांची संख्या लक्षणीय आहे. सिंगापूर, मलेशिया, थायलंड येथून थेट विमानसेवा असल्याने तेथून येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाणही मोठे आहे. या शानदार समारंभासाठी दा नांग या डेस्टिनेशनची निवड केल्याबद्दल त्यांनी ‘देशदूत’-‘सार्वमत’चे आभार मानत पश्चिम भारतात मराठी भाषेतील या वृत्तपत्राचा प्रसार चांगला झालेला असल्याबद्दल कौतुक केले. या सुंदर समारंभाचे फलित व्हिएतनाममधील पर्यटनस्थळांची माहिती भारतात पोहोचवण्यात होईल, असा विश्वासही मिस तनहाय यांनी व्यक्त केला.



### नवी उमेद जागविणारा पुरस्कार

नाशिक बार असोसिएशनचे उपाध्यक्ष अॅड. वैभव शेटे यांनी पुरस्कारार्थींच्या वतीने मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना शोधत ‘देशदूत’ने रायझिंग स्टार अवॉर्ड देऊन पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे. हा पुरस्कार आमच्यासाठी नवी उमेद जागविणारा आहे. संघर्षातून देदीप्यमान प्रगती साधणाऱ्या व्हिएतनामसारख्या देशात पुरस्कार वितरण सोहळा ठेवून आमच्या कर्तृत्वाला खऱ्या अर्थाने चार चाँद लावले आहेत. या देशाची कार्यसंस्कृती व देशभक्तीने ओतप्रोत भरलेला समाज पाहून आपणही प्रेरणा घेऊन काहीतरी चांगले करण्याचा संकल्प करूया, असे आवाहनही त्यांनी केले. दा नांग शहराची स्वच्छता, शिस्त पाहिल्यानंतर आजपासूनच किमान स्वत:पासून तरी एक चांगले काम करण्याचे मी ठरवले असल्याचे त्यांनी सांगितले.

### संघर्षाचा गौरव आनंददायी

राजूर-अकोले, जि. अहिल्यानगर येथील विश्व हायटेक नर्सरीचे संचालक वीरेंद्र थोरात यांनीही मनोगत व्यक्त करताना ‘देशदूत’ व ‘सार्वमत’ परिवाराला धन्यवाद दिले. व्हिएतनाम देशाने ज्या पद्धतीने संघर्ष करून अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाला नमवत प्रगती साधली आहे. अशा ठिकाणी आपला गौरव होणे हे भाग्याचे आहे. ग्रामीण भागातून आम्ही काम करतो, त्याची दखल घेतली गेली याचा आनंद आहे. अत्यंत नियोजनबद्ध व सुव्यवस्थित असा हा सोहळा झाला. त्यामागे आयोजकांनी घेतलेले कष्ट अभिनंदनास पात्र आहेत, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

### आई-वडिलांच्या कष्टाचे चीज

पुरस्काराबद्दल आभार मानताना अश्विनी ज्वेलर्सचे संचालक अक्षय वडनेरे यांचा गळा दाटून आला. आपल्या आई-वडिलांनी केलेल्या अफाट संघर्षाचे आज खऱ्या अर्थाने चीज झाले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आपण जे ठरवले ते करून दाखवले, त्याचा हा गौरव असला तरी त्यामागे आई-वडिलांची प्रेरणा व त्यांचे कष्ट आहेत, हे सांगताना मला मनापासून समाधान वाटते. ‘देशदूत’ परिवाराने एका सामान्य सराफी व्यावसायिकाच्या कार्यकर्तृत्वाला दिलेली ही दाद आयुष्यभर प्रेरणा देत राहील, असेही ते म्हणाले.



रावसाहेब वाकचौरे, अकोले, अहिल्यानगर



कु. वैभवी, सौ. दीपाली व गणेश सोपान मैड, लोणी, अहिल्यानगर



वीरेंद्र नानासाहेब थोरात, अकोले, अहिल्यानगर



जयेश मेहता, मुंबई



सुनील पाटील-पेलमहाले, दिंडोरी



सौ. तेजल व अमोल देशमुख, दिंडोरी



सौ. मेघना व सोमनाथ सोनवणे, दिंडोरी



प्रतीक क्षत्रिय, सिन्नर



अक्षय रमेश वडनेरे, नाशिक



अथर्व चिंतामणी, नाशिक



श्रीरंग खुळे, सिन्नर



शंकरराव वाघ, निफाड



डॉ. नीलेश निकम, नाशिक




या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी सर्वश्री, डॉ. विश्वास सावकार, नंदकुमार पाटील, रत्नाकर आहेर, संदीप गुलाटी, रविकिरण लोखंडे, दत्तू आंधळे, रामभाऊ लोणारे, मुकेश चव्हाणके व विशाल उगले या व्यावसायिकांनी खास नाशिकहून व्हिएतनाम येथे येऊन कार्यक्रमास हजेरी लावली. सर्व पुरस्कारार्थींचे त्यांनी अभिनंदन केले.



अॅड. डॉ. वैभव शेटे, नाशिक